# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र. १२६/२०१८

विषय : संलग्न स्वायत्त महाविद्यालयांतील (Affiliated Autonomous Colleges)/मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था (Recognised Autonomous Institutes) यांमधील अभ्यासक्रमासंदर्भात.

संलग्न स्वायत्त महाविद्यालये /मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांमध्ये जे अभ्यासक्रम राबवायचे आहेत, त्यासाठी खालील बाबींचे पालन करणे आवश्यक आहे :

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्वायत्त महाविद्यालयांबाबतच्या मार्गदर्शक नियमावलीमध्ये जी अधिकार मंडळे प्रस्थापित करणे आवश्यक आहे अशा अधिकार मंडळांच्या अभ्यासक्रमाबाबतचे मंजुरीचे ठराव व त्यासोबत अभ्यासक्रमांसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे विद्यापीठास सादर करावीत.

(२) संलग्न स्वायत्त महाविद्यालये /मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांमध्ये जे अभ्यासक्रम राबवायचे आहेत अशा अभ्यासक्रमांची पदवी विद्यापीठामध्ये प्रस्थापित (institute) झालेली असणे महत्वाचे आहे.

(३) विद्यापीठाने महाविद्यालयांना स्वायत्तता प्रदान केल्यानंतर जे विद्यार्थी नव्याने प्रवेशित केले जातील अशाच विद्यार्थ्यांना स्वायत्त अभ्यासक्रम लागू असतील.

(४) कोणत्या शैक्षणिक वर्षापासून, प्रवेशित होणा-या विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे त्या शैक्षणिक वर्षाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

(५) नवीन अभ्यासक्रम राबविण्यापूर्वी किमान सहा महिने अगोदर उपरोक्त नमूद माहिती विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, नव्याने स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी प्रथम शैक्षणिक वर्षासाठी जे अभ्यासक्रम राबवायचे आहेत त्यासंदर्भातील उपरोक्त माहिती किमान एक महिना अगोदर सर्व कागदपत्रांसह विद्यापीठास सादर करावी.

उपरोक्तप्रमाणे माहिती विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतरच विद्यापीठाकडून पुढील कार्यवाही केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७ )
जा.क्र. सीए / ४४३ /२०१७ )
दिनांक : ०२/०६/२०१७ )

2/6/18

उपकुलसचिव
( शैक्षणिक विभाग )

प्रति :
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था.